प्रेस नोट

नशिराबाद पोलीस स्टेशन
दि.१२/०३/२०२५

प्रति,
मा.संपादक साहेब,

---

दि.११/०३/२०२५ रोजी नशिराबाद पोलीस स्टेशन येथे सी.सी.टी.एन.एस.गु.र.नं. ३९/२०२५, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १०५, २८१, १२५ (ब), सह मो.वा.का.क. १८४, १३४ (ब) सह बाल कामगार अधिनियम १९८६ चे कलम १४ व बाल न्याय अधिनियम कलम ७९ प्रमाणे दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादी पो.हे.कॉ.२७९५ अतुल लक्ष्मण महाजन, नेम.-नशिराबाद पोलीस स्टेशन, जि.- जळगांव यांनी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन दिली की,

दि. ११/०३/२०२५ रोजी सकाळी ०७.५० वाजेचे पुर्वी नशिराबाद पोलीस स्टेशन हद्दीत नशिराबाद ते भुसावळ जाणारे हायवे रोडावर असलेल्या रेल्वे उड्डाण पुलावर सुरु असलेल्या एका लेनच्या सुरु असलेल्या रोडाचे कामाचे बाजुस सुरु असलेल्या सर्व्हीस रोडावर १) शैलेंद्रसिंग नथ्थुसिंग राजपुत, २) भुपेंदर मिथीलाल राजपुत, दोन्ही रा. दलेलपुर ता. जि. विटा (उत्तर प्रदेश), ३) योगेश कुमार राज बहादुर, जन्म तारीख ०१/१०/२०११, रा. सिढपुरा ता. कासगंज जि. पटीयाली (उत्तर प्रदेश) हे सर्व्हीस रोडावर मध्यभागी झोपलेले असतांना कोणतेतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन चालवत आणून वरील तिन्ही कामगार हे झोपलेले दिसत असतांना त्यांचे अंगावरुन वाहन नेल्यास त्यांचा जिव देखील जावू शकतो असे जीव घेण्याच्या उद्देशाने त्यांच्या अंगावरुन वाहन चालवून नेवून तिन्ही कामगार यांना गंभीर दुखापती करुन त्यांचा मृत्यु घडवून आणला आहे. तसेच यातील तिसरा मयत इसम हा अल्पवयीन असल्याचे माहीत असतांना देखील त्याला ठेकेदार याने कामावर ठेवलेले आहे. तसेच त्याची पिळवणूक केली आहे. वगैरे मजकुरचे फिर्याद वरुन गुन्हा दाखल आहे. आहे.

सदर गुन्हा दि. ११/०३/२०२५ रोजी १६.३९ वाजता दाखल झाला होता.सदर गुन्ह्याचे तपासी अंमलदार नशिराबाद पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरी. ए. सी. मनोरे हे करीत असुन मा. पोलीस अधीक्षक सो. श्री. माहेश्वर रेड्डी साहेब, अपर पोलीस अधीक्षक सो. श्री. नखाते साहेब, उपविभागीय पोलीस अधीकारी सो. श्री. पिंगळे साहेब यांचे मार्गदर्शनात पो.हे.कॉ. ६२१ उमाकांत पाटील, नेम. SDPO कार्यालय भुसावळ, पो.कॉ.३३९८ प्रशांत परदेशी, पो,कॉ. ५९ जावेद शहा, पो.कॉ. २३०१ राहुल वानखेडे, तिन्ही नेम. बाजारपेठ पोलीस स्टेशन भुसावळ यांचे पथक नेमुन तांत्रीक विश्लेशन व गुप्त बातमीदारा मार्फत माहीती घेवुन अवघ्या आठ तासात गुन्ह्याचा छळा लावुन आरोपी निष्पण्ण करुन, डंपर क्र. MH १९ CY ३१९१ वरील आरोपी चालक प्रकाश कुमार सुदामा प्रसाद पटेल वय २४ वर्ष, रा. उफरवली, पोष्ट - कदौर, तहसील सिहाबाद जि. सिंधी (मध्य प्रदेश) यास ताब्यात घेवुन अटक केली आहे. त्याबाबत मा.पोलीस अधीक्षक सो. श्री. माहेश्वर रेड्डी साहेब यांनी वरील पथकातील सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे कौतुक केले आहे.

